राज्य योजना सन २०१८-१९ अंतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम या योजनेमार्फत (२४०६ १५२१) रु. ६१४.६९ लक्ष रक्कमेचा सर्वसाधारण लाभार्थ्यांना गॅस पुरवठा संबंधी बांधील कामांचा चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१८/प्र.क्र. ८३/फ-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :-१९ मार्च, २०१९

<u>संदर्भ</u>:- १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/यो/इए/संवव्य/प्र.क्र.०१/१८-१९/२३२६, दि.१३.०३.२०१९.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/यो/इए/प्र.क्र.०१/१८-१९/५७७, दि.०३.०६.२०१८.

३) वित्त विभाग,शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.

४) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि.०८.०३.२०१९.

५) महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन, क्र.बीयुडी-२०१९/२४०६/प्र.क्र.१९/ब-१, दि.११.०३.२०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी त्यांच्या संदर्भाधीन क्र.२ येथील दि.०३.०६.२०१८ रोजीच्या प्रस्तावान्वये "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम " (२४०६ १५२१) या योजनेंतर्गत संरक्षित वनांचे लगत क्षेत्रातील गावातील सर्वसाधारण जातीच्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने कुकींग गॅस व बायोगॅस, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्ष लागवडीचे संरक्षणासाठी प्रोत्साहनाकरिता रु.१३०१.५० लक्षचा बांधील कामांचा चालु बाब प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णय दि.२७.०९.२०१८ अन्वये ७० टक्केच्या मर्यादेत रु.६००.८९ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून आता संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रान्वये उर्वरित ७००.६१ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम " (२४०६ १५२१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता एकूण रु. ५४६७.८८ लक्ष

नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला असुन सन २०१८ च्या पावसाळी अधिवेशनात रु. ३०००.०० लक्ष नियतव्यय पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या दि.०८.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन महसूल व वन विभागाच्या दि.११.०३.२०१९ रोजीच्या ज्ञापनान्वये सन २०१८-१९ चे आठमाही सुधारीत अंदाज उपलब्ध करुन दिले असून सदर सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत खर्च करण्यास विभागास प्राधिकृत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत सदर योजनेअंतर्गत रु. ७९१६.६८ लक्ष निधी वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आतापर्यंत सदर योजनेंतर्गत रु. ७३०१.९९ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सद्यस्थितीत रु.६१४.६९ लक्ष इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे.

त्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी वनाशेजारील गावातील सर्वसाधारण लाभार्थ्यांना कुकींग गॅस पुरवठा करणेबाबतच्या बांधील कामांकरिता “ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम” (२४०६ १५२१) या लेखाशीर्षाअंतर्गत सादर केलेला प्रस्ताव आठमाही सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत असल्याने त्यास निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपुर यांनी प्रस्तावित केल्यानुसार सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम " (२४०६ १५२१) या योजनेंतर्गत वनाशेजारील गावातील सर्वसाधारण लाभार्थ्यांना कुकींग गॅस पुरवठा करणेबाबतच्या बांधील कामांकरिता **रु.६१४.६९ लक्ष (सहा कोटी चौदा लाख एकोणसत्तर हजार)** इतक्या रक्कमेस ५०-इतर खर्च या उद्दिष्टाखाली खर्च करण्यास नमुद अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

सदरहू शासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) सदर योजनेकरिता वितरित केलेला निधी खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४) त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ वरील दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखील दक्षता घ्यावी.

५) सदर प्रस्तावांतर्गत करावयाच्या कामाचा खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीव, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (बिगर आदिवासी उपयोजना) १०१(११) वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (११)(१०) ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम (संयुक्त वनव्यवस्थापन) कार्यक्रम (२४०६ १५२१) राज्य योजनांतर्गत योजना या लेखाशिर्षांतर्गत सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक.०८.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकाअन्वये संबंधित प्रशासकीय विभागास आठमाही सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१९१५१५३१८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.03.19 15:17:27 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
५) मुख्य वनसंरक्षक (धोरण व तंत्रज्ञान)/(संयुक्त वनव्यवस्थापन व नियोजन).
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
८) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
९) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
१०) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.